**पोलीस उप-आयुक्त,गुन्हे पिंपरी चिंचवड**
पोलीस आयुक्त कार्यालय,पिंपरी चिंचवड,
प्रेमलोक पार्क,चिंचवड,पुणे-३३दुरध्वनी क्र. ०२०-२७३५०१२०
ई मेल आयडी – dcphq.pcpc-mh@gov.in

## *प्रेस नोट ता.१९/०९/२०२४*

# दोन सराईत चोरटयांकडून महागडया मोटार सायकल हस्तगत, वाहनचोरीचे ६ गुन्हे उघडकीस

## पिंपरी चिंचवड, गुन्हे शाखा, युनिट १ ची कारवाई

मा.पोलीस आयुक्त श्री विनयकुमार चौबे साहेब यांनी पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे हद्दीत वाढत असलेल्या वाहन चोरी गुन्हयाचे अनुषंगाने गुन्हेगारांची माहीती मिळवुन कायदेशीर कारवाई करणेबाबत गुन्हे शाखांना आदेशीत केले आहे. गुन्हे शाखा युनिट -१ चे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम त्यांचे अधिपत्याखालील पोलीस अधिकारी व अंमलदार असे पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीत वाहन चोरी करणारे गुन्हेगारांची माहीती घेत असतांना दिनांक १६/०९/२०२४ रोजी पोलीस अंमलदार सचिन मोरे व प्रमोद गर्जे यांना त्यांचे गोपनिय बातमीदाराकरवी बातमी मिळाली कि, दोन इसम चोरीची दुचाकी विक्रीकरीता अग्निशामक केंद्र मोशी परिसरात येणार आहेत अशी खात्रीशीर बातमी मिळाली.

गुन्हे शाखा पोलीस उप आयुक्त संदिप डोईफोडे व सहा. पोलीस आयुक्त डॉ. विशाल हिरे यांना याबाबतची माहीती कळवुन त्यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट १ चे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांनी युनिट १ मधील अधिकारी - अंमलदार यांची दोन पथके तयार करुन मोशी परिसरातील अग्निशामक केंद्र परिसरात सापळा लावुन थांबले असता बातमीदाराने सांगितलेल्या वर्णनाचे दोन इसम दुचाकी मोटार सायकलवर संशयितरित्या दुचाकीवर फिरत असतांना दिसुन आल्याने पोलीस पथकाने पळुन जाण्याचा प्रयत्न करीत असलेल्या दोन्ही इसमांना पाठलाग करुन शिताफीने पकडले. त्यांची नावे १) प्रसाद भारत पांडव, वय २३ वर्षे रा.रमेश सस्ते यांचे भाडयाच्या खोलीत मोशी पुणे त्यांचा साथीदार नामे २) सचिन अशोक सुदाम वय २४ वर्षे रा. विश्वकर्मा कॉलनी वेरुळ ता. खुलताबाद जि. संभाजीनगर अशी आहेत. त्यांच्या ताब्यात मिळालेली बजाज पल्सर २२० दुचाकी मोटार सायकल ही डिसेंबर २०२२ मध्ये मोशी येथुन चोरी केल्याचे निष्पन्न झाले तसेच त्याबाबत एमआयडीसी

भोसरी पोलीस स्टेशन येथे गु.रजि.नं.७३६/२०२२ भादवि कलम ३७९ गुन्हा दाखल असल्याचे उघड झाले. आरोपीबाबत अधिक माहिती घेता आरोपी अ.क्र. १ हा संभाजीनगर येथील सराईत वाहन चोर असल्याची माहिती प्राप्त झाली.

सदर आरोपींकडे कौशत्याने अधिक तपास करता त्यांनी पिंपरी चिंचवड , शिर्डी तसेच सोलापुर परीसरातुन बुलेट, पल्सर, यामाहा, स्प्लेंडर, हिरो डिलक्स महागड्या मोटार सायकली चोरी करुन त्या संभाजीनगर, अहमदनगर या भागामधील नागरीकांना विक्री करण्याकरीता मोशी येथील सस्तेवस्ती येथे लपवुन ठेवल्या असल्याचे उघड झाले. ०२ बुलेट, ०१ पल्सर, ०१ यामाहा, ०१ स्प्लेंडर, ०१ हिरो डिलक्स अशा एकुण ०६ मोटार सायकली सुमारे ५ लाख रुपये किंमतीच्या हस्तगत करण्यात आल्या आहेत. खालील प्रमाणे गुन्हे दाखल असल्याचे उघड झाले आहे.

१) एम.आय.डी.सी भोसरी पोलीस स्टेशन गु.र.नं ७३६/२०२२ भादवि कलम ३७९
२) एम.आय.डी.सी भोसरी पोलीस स्टेशन गु.र.नं २२४/२०२३ भादवि कलम ३७९
३) चाकण पोलीस स्टेशन गु.र.नं १३४/२०२३ भादवि कलम ३७९
४) चिंचवड पोलीस स्टेशन गु.र.नं ३३६/२०२३ भादवि कलम ३७९
५) शिर्डी पोलीस स्टेशन जि. अहमदनगर गु.र.नं ८७८/२०२३ भादवि कलम ३७९
६) मद्रुप पोलीस स्टेशन जि. सोलापुर ग्रा. गु.र.नं २७/२०२१ भादवि कलम ३७९

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री विनयकुमार चौबे, सह पोलीस आयुक्त श्री शशिकांत महावरकर, अप्पर पोलीस आयुक्त श्री वसंत परदेशी, पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री संदिप डोईफोडे, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे श्री विशाल हिरे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट १ चे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम, श्रेणी पोलीस उपनिरीक्षक शिवाजी कानडे, पोलीस अमंलदार सचिन मोरे, अमित खानविलकर, गणेश महाडीक, प्रमोद गर्जे, स्वप्निल महाले यांनी केली आहे.

(संदिप डोईफोडे)
पोलीस उप आयुक्त गुन्हे
पिंपरी चिंचवड